करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...

परखड अग्रलेख | वस्तुनिष्ठ बातम्या
विविध सदरे | करमाळेकरांची खास ओळख

संस्थापक संपादक : डॉ.ॲड.बाबूराव हिरडे
संपादक : सौ.उषादेवी बाबूराव हिरडे,
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०

वर्ष 31 वे

साप्ताहिक कमलाभवानी

# संदेश

www.saptahiksandesh.com | kamalabhavanisandesh@gmail.com

रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३३ वे | अंक क्र.८० | पाने-१२ | दि.२७/५/२०२२ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत ३ रु.

आपल्या व्यवसायाची ऑनलाईन जाहिरात करण्यासाठी उपयुक्त ठिकाण
साप्ताहिक संदेश ऑनलाईन न्यूज पोर्टल
9822058106

जनकल्याण फार्मा
मेडिकल & डिस्ट्रिब्युटर्स
ॲलोपॅथीक | जेनेरिक | आयुर्वेदिक | सर्जिकल | जनरल
तसेच त्वचा रोग, बीपी, शुगर वरील सर्व प्रकारची औषधे होलसेल व किरकोळ दरात मिळण्याचे एकमेव ठिकाण !
एसटी स्टॅन्ड समोर, करमाळा प्रोप्रा : अजिंक्य अनिल घरबुडे, मो.9527323743 /समाधान (8308620816)

# करमाळा नगरपालिकेचा कारभार रामभरोसे - प्रशासनाचे दुर्लक्ष

## समस्याने नागरीक त्रस्त

**करमाळा(सं.प्र.) : करमाळा नगरपालिकेवर प्रशासक नेमल्यापासून नगरपालिकेचा कारभार रामभरोसे झाला असून, प्रशासनात कोणताही ताळमेळ नसल्याने शहरात स्वच्छतेपासून ते पाणी पुरवठा व अन्य सोयी सुविधांचा बोजवारा उडाला आहे. त्यामुळे प्रशासनाबद्दल नागरीकातून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.**

करमाळा नगरपालिकेवर गेल्या चार महिन्यापासून प्रशासक आहे. प्रशासकाची नेमणूक होईपर्यंत करमाळा नगरपालिकेचा कारभार बऱ्यापैकी चालू होता. शासनाने प्रशासक नेमल्यानंतर अध्यक्ष व नगरसेवकांचे सर्व अधिकार संपले . त्यानंतर अधिकारी व कर्मचारी यांच्यावरील बंधनं कमी झाली. प्रशासक त्यांच्या सोयीने येतात व जातात त्यामुळे संबधितांना कोणाचाही धाक राहिलेला नाही. शहरातील नगराध्यक्ष वैभवराजे जगताप यांनी चालू केलेली स्वच्छता मोहिमही बंद पडलेली आहे. अनेक काही महिना-महिना गटारी



साचून रहातात. तीच अवस्था रस्ता स्वच्छतेच्या बाबतीत आहे. वेताळपेठेत तर गटारी तुडुंब भरून रस्त्यावर पाणी नेहमीच येते, पण त्याकडे कोणी लक्ष देत नाही. मागील काही दिवसात पिण्याचे पाण्याचेही

> शहरात प्रत्येक गल्लीत बांधकामे चालू आहेत, त्याचा पसारा रस्त्यावरच पडलेला आहे.या बरोबरच पालिकेने रस्त्याच्या कामासाठी रस्त्यावरच खडी पसरली आहे. अनेक ठिकाणी पाण्याचे नळ फुटलेले असून पाणी वाया जाते.मंडईत जनावरे खुल्ले आम फिरतात, बाजारकरू व ग्राहकांना त्रास होतो. उपनगरात स्ट्रीट लाईटच्या समस्या आहेत. मेनरोडवर मुतारीची सुविधा नाही. बसस्थानकच्या आजूबाजूला अस्वच्छतेचे साम्राज्य आहे. तीच अवस्था जीन मैदानाची आहे.

नियोजन कोलमडले होते. अनेक भागात घंटागाडी जात नाही. काही दिवस ही गाडीही काही भागात बंद होती. तसेच मैला वाहून नेणारी गाडीही सहा महिन्यापासून बंद आहे. शहरातील डांबरी रस्त्याचेही काम अर्धवट अवस्थेत राहिले आहे. सध्या छत्रपती चौक ते डॉ.व्होटकर दवाखाना (पान नं.३ वर)



जीवनामध्ये कितीही संकटं आलेतरी ठाम उभे राहिल्यास यश मिळते.

संपादकीय......................................................

# 'आदिनाथ'ची धक-धक

या ना त्या कारणाने आदिनाथ सहकारी साखर कारखाना हा सातत्याने चर्चेत राहत आहे. या कारखान्याच्या उभारणीपासून ते आजपर्यंत वेगवेगळ्या घडामोडीने कारखान्याचा इतिहास मोठा रंजक झालेला आहे. सन १९७० ला शुभारंभ झालेल्या या कारखान्याचा गळीत चाचणी हंगाम १९९३ ला झाला. २३ वर्षाच्या प्रतिक्षेनंतर हा कारखाना सुरू झाला, पण त्यापूर्वी झालेल्या निवडणुका आणि आलेले प्रशासक याबाबी उल्लेखनीय आहेत. कारखाना चालू झाल्यानंतर या कारखान्याच्या सत्तेच्या माध्यमातून तालुक्याच्या राजकारणात सातत्याने कारखान्याचा प्रभाव पडलेला आहे.ज्यांनी कारखाना चांगल्या पध्दतीने चालविला त्यांना सत्तेसाठी चांगला कौल मिळाला. परंतू ज्यांनी कारखान्यात राजकारण केले त्यांना राजकारणातून बाजुला काढण्याइतपत आदिनाथचा प्रभाव वारंवार दिसून आलेला आहे.

सध्याच्या स्थितीत कारखाना बंद असूनही कारखान्याची चर्चा तालुक्याच्या राजकारणात आणि सर्वसामान्य नागरीकात कायम सुरू आहे. कारखाना बंद असल्यामुळे यावर्षी अनेक ऊस उत्पादक शेतकऱ्यांना आदिनाथचे चांगल्या अर्थाने स्मरण झाले आहे. हा कारखाना व्यवस्थित सुरू असतातर सर्वसामान्यांना जो शेवटच्या टप्प्यात त्रास झाला आणि पैशाची धुळधाण झाली ती वाचली असती. काही काळ कारखान्याचे गाळप कमी झाले, साखरेला भाव कमी मिळाला आणि प्रशासनाच्या काही चुका यामुळे आदिनाथ अडचणीत आला. कारखान्यावर कर्ज वाढले. कामगारांच्या पगारीचा बोजा, ऊस वाहतूकदाराची देणी, काही सभासदांचे व व्यापाऱ्यांचे देणे यामुळे गेल्या दोन वर्षात कारखान्याची अवस्था खड्ड्यातून अधिक खड्ड्यात गेली आहे. दरम्यान आदिनाथवर महाराष्ट्र स्टेट को.ऑप. बँकेचे १२८ कोटी ६ लाख ४१ हजार रू. कर्जासाठी बँकेने कारखान्याची सर्व मालमत्ता म्हणजे ९५.७९ हेक्टर जमीन व मशिनरीसह तसेच साखरेसह सेक्युरिटायझेशन कायद्यातील कलम १३/४ अन्वये १६ ऑक्टोबर २०२० रोजी ताब्यात घेतली व त्याचा फेर ताबा पुन्हा कारखाना व्यवस्थापकाकडे दिला आहे. असे असलेतरी कारखाना प्रशासनाने मात्र राज्य सहकारी बँकेच्या व्यवस्थापकाच्या परवानगीशिवाय कोणताही व्यवहार करण्याचा नव्हता. थोडक्यात केवळ प्रशासनाने या कारखान्याची राखण करणे एवढेच काम होते.

पुढे या सहकारी बँकेने सदरचा कारखाना भाडेतत्वावर देण्यासाठी टेंडर नोटीस काढली. त्यानूसार १४ व १५ डिसेंबर २०२० ला टेंडर भरणे व ४ जानेवारी २०२१ ला हे टेंडर ओपन करण्याचे जाहीर केले. यातही पुढे तारीख बदलून हे टेंडर पुन्हा २० जानेवारीला मागविले. पुढे त्यानूसार सदर कारखाना भाडेतत्वावर चालविण्यासाठी बारामती ॲग्रो लि; यांना देण्यात आला. याबाबत ३१/३/२०२१ ला ऑनलाइन सभा घेतली व ऑनलाइन सभेतील ९८ टक्के सभासदांनी मान्यता दिली. हा कारखाना सुरूवातीला १५ वर्षेभाडेतत्वावर देण्याचे ठरविले होते. परंतू बारामती ॲग्रोने त्याची मुदत २५ वर्षेद्यावी; अशी मागणी केली. त्यानूसार त्यांना हा कारखाना २५ वर्षेभाडेतत्वाने देण्याचे ठरले. त्यातील निविदेनूसार पहिल्या वर्षी ९ कोटी भाडे, दुसऱ्या वर्षी साडेनऊ कोटी भाडे तर तिसऱ्या वर्षी १३ कोटी असे प्रतिवर्षी २५ वर्षाकरीत म्हणजे सन २०४४-४५ पर्यंत फिक्स भाडे व टॅगींग रक्कम ठरविण्यात आली होती. तसेच ३ लाख ७५ हजार मेट्रीक टनापेक्षा जास्त गाळप झाल्यास नियमानूसार टॅगींग देण्याचे ठरलेले आहे. अशाप्रकारे करार झाल्यानंतर २७ जानेवारी २०२१ ला आदिनाथ कारखान्याने स्वीकृती पत्र दिले परंतू बारामती ॲग्रोने मात्र करार होवूनही आदिनाथला कोणतीही रक्कम दिली नाही. महाराष्ट्र सहकारी बँक मुंबई व राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ, दिल्ली यांच्यातील आपापसातील वाद आणि न्यायालयातील दाखल झालेले प्रकरण यात बारामती ॲग्रो निवांत राहिले. शासकीय संस्था आपापल्या मुद्यावर ठाम राहिल्या आणि आदिनाथचा मात्र यात जीव गुदमरला. जो आदिनाथ तालुक्यातील सर्वसामान्य नागरीकांच्या अस्मितेचा भाग आहे; हा आदिनाथ दिवसेंदिवस खोलात गेला आहे. याला जबाबदार कोण ? हा खरा प्रश्न आहे.

संचालक मंडळ आणि कामगार मंडळातील असमन्वय, न्यायालयात दाखल झालेला वाद, न्यायालयाने कामगारांसाठी प्रतिक्विंटल १५० रू. काढून ठेवण्याबाबत केलेली सुचना या सर्व बाबी फक्त कागदावरती राहिल्या आणि आदिनाथची अवस्था अतिशय केविलवाणी झाली. खरंतर कारखान्याच्या गोदामात ९० कोटी रूपये किंमतीची साखर उपलब्ध असताना केवळ ३८ कोटीसाठी (व्याजासह) बँकेने कारखाना जप्त करणे हीच बाब अन्यायकारक आहे. विशेष म्हणजे संचालक मंडळाने यासाठी दिलेला होकार ही सुध्दा बाब चुकीची आहे. समजा कारखाना भाडेतत्वावर द्यायचाच असेलतर कामगारांचे पगार, ऊसतोड वाहतूक ठेकेदारावर काढलेले कर्ज, कामगार पतसंस्थेचे कर्ज तसेच अन्य किरकोळ देणी तात्काळ देण्याबाबत सहकारी बँकेने योग्य ते आदेश देणे गरजेचे होते. तसेच बारामती ॲग्रोने नियमानूसार कारखान्याकडे तात्काळ पैसे देणे आवश्यक होते. परंतू बारामती ॲग्रोने कराराप्रमाणे कोणतेही पैसे भरले नाही आणि त्यामुळे कारखान्याच्या अडचणीत आणखी वाढ झालेली आहे. दरम्यानच्या कालावधीत आदिनाथ बचाव समिती स्थापन झाली व त्यांनी वेगवेगळे प्रयत्न करून कारखाना भाडेतत्वाच्याऐवजी सभासदांनी चालविण्याबाबत निर्णय घेतला होता. त्यासाठी अनेक बैठका झाल्या, अनेक प्रयत्न झाले पण हा प्रयोगही इतकासा यशस्वी झाला नाही. शेतकरी संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष व माजी संचालक दशरथ कांबळे यांनीही कामगारांचे हित समोर ठेवून आदिनाथ वाचविण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले, पण त्यांनाही यश आले नाही. आदिनाथ कारखाना भाडेतत्वावर देऊ नये; याबाबत घेतलेल्या ऑनलाइन बैठकीत सभासदांनी मात्र पाठबळ दिले ही बाब उल्लेखनीय आहे. या सर्व बाबीचा विचार करता आदिनाथचे चेअरमन धनंजय डोंगरे यांनी डीआरटी पुणे (डेबीटस् रिकव्हरी ट्रीबुनल) यांच्याकडे महाराष्ट्र सहकारी बँकेच्या विरूध्द राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ विरूध्द सरफेसी ॲक्टनूसार सेक्शन १३/२ अन्वये व दिलेली नोटीस व १३/४ अन्वये कारखाना ताब्यात घेणेबाबत केलेल्या कारवाईबाबत दावा दाखल केला आहे आणि सदर दाव्यात सरफेसी ॲक्ट नूसार पुढील कारवाई करू नये; अशी तुर्तातूर्त मागणी केलेली आहे. विशेष म्हणजे डीआरटी न्यायालयाने आदिनाथची मागणी मान्य करत सदर प्रकरणाचा निर्णय होईपर्यंत बँकेच्या पुढील कारवाईस स्थगिती दिलेली आहे.

एकंदरीत आजच्या घडीला महाराष्ट्र सहकारी बँकेने जी कारवाई केली होती, कारखाना भाडेतत्वावर देण्याचा केलेला करार व इतर सर्व बाबी सध्यातरी थांबलेल्या आहेत. असे असलेतरी कारखान्याचा खरा प्रश्न कसा व कोण सोडवणार ? हा खरा महत्वाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. कारण सध्याच्या संचालक मंडळाचा कालावधी फारच कमी राहिलेला आहे. दुसऱ्या बाजुला कारखान्याची निवडणूक आणि तिसऱ्या बाजुला कर्जाचा डोंगर अशा स्थितीत नेमका मार्ग कसा निघणार ? कामगारांचे पगार, इतर देणी, बँकांचे व्याज वाढत जाणार असून यंत्रसामुग्री रोजच्या रोज झिजत जात आहे. यावर्षी गाळप होवू शकले नाही, पण पुढील वर्षी जर गाळप झाले नाहीतर आदिनाथ पुन्हा उभा राहील की नाही; याची शाश्वती देता येणार नाही. त्यामुळे कारखान्याचे सभासद आणि तालुक्यातील राजकीय मंडळी यांना मोठा गांभीर्याने विचार करावा लागणार आहे. आदिनाथची निवडणूक लावून आदिनाथ खर्चात टाकण्यापेक्षा आदिनाथची निवडणूकीत सर्व गट व स्थानिक पक्षांना संधी देत ही निवडणूक बिनविरोध करण्याची गरज आहे. एवढेच नाहीतर सर्वांनी संघटीत होऊन काही कालावधीसाठी आदिनाथला आर्थिक मदत करून सन्मानाने उभा करण्याची गरज आहे. तरच आदिनाथची धकधक कमी होईल !

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

पान १ वरून पुढे...

## करमाळा नगरपालिकेचा कारभार रामभरोसे - प्रशासनाचे दुर्लक्ष

या दरम्यान रस्त्याचे काम चालू केले आहे. रस्त्यावर आठ दिवस झाले फक्त खडी टाकली आहे. त्यामुळे नागरीकांचे मोटारसायकलचे अपघात वाढले आहेत. एवढेच काय तर प्रवासी खडीपेक्षा पहिलाच रस्ता बरा होता; असे म्हणत आहेत. याबाबत चौकशी केली असता, नगरपालिकेचे बांधकाम इंजिनियर यांना या कामाकडे येण्यास वेळ नाही. त्यामुळे या रस्त्याचे काम रखडल्याचे बोलले जात आहे. पण प्रत्यक्षात नागरीकांना ही बाब माहिती नसल्याने ते ठेकेदाराला दोष देत आहेत. थोडक्यात करमाळा नगरपालिकेचा कारभार रामभरोसे झाला असून अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या चुकीच्या निर्णयामुळे व धोरणामुळे जनतेला नाहक त्रास होत आहे. प्रशासक प्रांताधिकारी ज्योती कदम यांनी याकडे गांभिर्याने लक्ष देण्याची गरज आहे. दररोज नसलेतरी किमान आठवड्यातून दोन ते तीन दिवस पालिकेत हजर राहून या समस्या सोडवल्या पाहिजेत. शहरातील प्राथमिक सुविधा योग्य प्रकारे मिळतात की नाही, याची प्रत्यक्ष जागेवर जावून पहाणी करावी , अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## राजकारणापेक्षा समाजकारण महत्वाचे : प्रताप जगताप



करमाळा( सं.प्र.) : समाजामध्ये काम करत असताना राजकारणाला कमी महत्व देऊन समाजकारणाला जास्त महत्व दिले पाहिजे; असे मत अखिल भारतीय काँग्रेस आयचे करमाळा तालुका अध्यक्ष प्रताप जगताप यांनी व्यक्त केले.

सोशल मिडीयावर सोलापूर जिल्हा अपंग कबड्डी संघास पेन येथे संपन्न होणाऱ्या स्पर्धेस जाण्यासाठी ड्रेसकोडची अत्यंत गरज होती. वेगवेगळ्या ग्रूपच्या माध्यमातून मदत मिळण्यासाठी जिल्हा अपंग टिमचे कर्णधार सागर बंडू कदम यांनी विनंतीही केली होती. परंतू कोणी मदत करो किंवा ना करो, पण ही पोस्ट प्रताप जगताप यांच्या वाचण्यात येताच त्यांनी लगेच संघाचे कर्णधार सागर कदम यांना फोन करून विचारणा केली व संघातील सर्व खेळाडूंना किट वाटप केले. समाजाकडून दुर्लक्षित होत असलेल्या अपंग खेळाडूकडे जाणीवपूर्वक लक्ष देऊन त्या खेळाडूंमध्ये असणाऱ्या कलागुणांना वाव देण्याचे काम प्रताप जगताप यांनी केले. यावेळी बाजार समितीचे उपसभापती चिंतामणी जगताप, ज्योतीक्रांती शिक्षण मंडळाचे प्राचार्य सानप, सुजय जगताप, उत्तरेश्वर सावंत, योगेश राखुंडे, विजय तळेकर, दिपक पडवळे, गणेश फलफले, नितीन चोपडे उपस्थित होते.

**प्रियंका आय केअर हॉस्पीटल**
**डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र**
पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा.
फोन.222233, मो.नं.9423222266
डॉ.डी.बी.केमकर
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन
रविवारी बंद
उपलब्ध सुविधा...
- मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
- जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
- फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
- सुसज्ज ऑपरेशन थिएटर
- एस्कॅन बायोनेट्री आणि केरॉटोमॅट्री
- जपानच्या अत्याधुनिक कॉम्प्युटरवर नेत्र तपासणी व चष्म्याचे नंबर काढण्याची सोय
- नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार
- लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय

वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)
अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER)

**सिध्दीविनायक ऑप्टीकल्स्**
आमच्याकडे नंबरचे चष्मे व गॉगल्स योग्य दरात मिळतील.
बँक ऑफ इंडिया शेजारी, बसस्टॅन्ड समोर, करमाळा. प्रोप्रा : वर्षा गायकवाड मो.९५२७२६८१८१/७७५६८२५८२६



डॉ.सौ.सुजाता मेहता व डॉ.राजेश मेहता यांचे चिरंजीव
**चि.अपूर्व राजेश मेहता**
एम.बी.बी.एस. फायनल परीक्षेत यश संपादन केल्याबद्दल
**हार्दिक अभिनंदन !**
शुभेच्छुक
**न्यु वर्धमान जनरल स्टोअर्स**
मंगळवार पेठ, करमाळा., जि.सोलापूर
प्रोप्रा : धीरज का.सोळंकी, मो.९४२१०६०५२१

## केत्तूर येथील प्रगतशील बागायतदार मारूती पाटील यांचे निधन



करमाळा(सं.प्र.) : केत्तूर नं.२ (ता.करमाळा) येथील प्रगतशील बागायतदार मारूती साहेबराव पाटील (वय-८३) यांचे २५ मे ला रात्री भिगवण येथील खाजगी हॉस्पिटलमध्ये निधन झाले आहे. त्यांचे मागे तीन मुले, सुना, नातवंडे, परतवंडे असा परिवार आहे. पाटील हे सांप्रदायिक विचाराचे असून अत्यंत शांत व संयमी म्हणून त्यांची ओळख होती. मकाई सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक रामराव पाटील यांचे धाकटे बंधू तर केत्तूरचे माजी सरपंच अशोक पाटील यांचे चुलते होते. शहाजी पाटील, अमृत पाटील व प्रताप पाटील यांचे ते वडील होते. त्यांच्या अंत्यविधी प्रसंगी सर्व स्तरातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सस्नेह निमंत्रण



श्री खंडेराया प्रसन्न



श्री गजानन प्रसन्न



श्री तुळजाभवानी प्रसन्न

सस्नेह निमंत्रण

**जागरण गोंधळ (गोड)**
**विविध पारंपारिक सांप्रदायिक कार्यक्रम**

मित्ती जेष्ठ शु.६ शके १९४४ **शुक्रवार दि.३/६/२०२२** रोजी विविध पारंपारिक-सांप्रदायिक कार्यक्रमासह जागरण गोंधळ कार्यक्रम करण्याचे योजिले आहे. तरी या कार्यक्रमास आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

**कार्यक्रम पत्रिका**

**भेदीक (गाण्याची जुगलबंदी)**
वेळ : सकाळी १०.०० ते सायं. ६.००
- **शाहीर हाशम शेख(तुरेवाले)** बावची, ता.परांडा
- **शाहीर कल्याण माळी (कलगीवाले)** कार्ला, ता.परांडा

.....उद्घाटक......
**ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज घोडके (श्रीगोंदा)**

**खंडोबा देवाची मार्गपूजा**
वेळ - सायं ६.०० ते ७.०० भोसे आराधी मंडळ/जागरण गोंधळ पार्टी

**किर्तन..** ह.भ.प.प्रकाश महाराज दंडे (राशिन) वेळ-सायं. ७ ते ८.३०
**उपस्थितांचे स्वागत व मार्गदर्शन : ह.भ.प.डॉ.ॲड.बाबूराव हिरडे** (करमाळा)

**देव-देवता स्तुतीस्तवन (देवीची गाणी)**
वेळ - रात्री ९.०० ते १०.३०
**सहभागी कलाकार :** ● ह.भ.प.महादेव सुर्यवंशी (गायनाचार्य) बंगाळवाडी, ता.परांडा ● परमेश्वर साळवे (गायनाचार्य) गौंडरे ● साळुबाई खडके (गायनाचर्य) हिवरे, ता.करमाळा. ● ह.भ.प.सुरेश महाराज चव्हाण (मृदुंगवादक)● ह.भ.प.हनुमंत महाराज नीळ (गायनाचार्य) निमगाव ह
**उद्घाटक : भारत पुरूषोत्तम घुगीकर (पुरोहित)** साडे, ता.करमाळा.

जय तुळजाभवानी जागरण गोंधळ पार्टी, शेळगाव, ता.परांडा यांचा
**जागरण गोंधळ कार्यक्रम** (वेळ : रात्री १०.३० ते पहाटे ५.३०)
**सहभागी कलाकार :** सचिन काटे (वाघे), दत्ताजीराव खैरे (हार्मोनियम वादक)
**उद्घाटक :** ह.भ.प.बाबा महाराज ढवळे (हाळगाव, ता.जामखेड)

आपले नम्र
सौ.रंजना(जयश्री) निवृत्ती — श्री.निवृत्ती दत्तात्रय सुरवसे (मा.मुख्याध्यापक, साडे हायस्कुल साडे)
सौ.अमृता प्रितम — श्री.प्रितम निवृत्ती सुरवसे
सौ.शितल प्रतिक — श्री.प्रतिक निवृत्ती सुरवसे

**समस्त सुरवसे परिवार, भोसे**

टीप : सर्वांना निमंत्रण पत्रिका दिलेल्या आहेतच. नजरचुकीने कोणास मिळाली नसल्यास हेच निमंत्रण समजून कार्यक्रमास उपस्थित रहावे, ही नम्र विनंती !

## निर्यातक्षम केळी उत्पादनासाठी
# आधुनिक तंत्राचा वापर करत उत्पादन वाढ साधणे गरजेचे : डॉ.पाटील



करमाळा(सं.प्र.) : निर्यातक्षम केळी उत्पादनासाठी वातावरण सुसंगत व आधुनिक तंत्राचा वापर करत उत्पादन वाढ साधणे गरजेचे आहे; असे मत आंतरराष्ट्रीय केळी तज्ञ व जैन इरिगेशन सि.लि.जळगावचे उपाध्यक्ष डॉ.के.बी. पाटील यांनी व्यक्त केले.

झरे फाटा येथे आयोजित निर्यातक्षम केली पिक परिसंवाद कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून डॉ.पाटील बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषीरत्न आनंद कोठडिया हे होते. पुढे बोलताना डॉ.पाटील म्हणाले, की सोलापूर जिल्ह्यामध्ये केळी पिकासाठी अत्यंत अनुकूल वातावरण आहे. केळी हे संपूर्ण वर्षभर घेतले जाणारे, ऊसाला पूरक असणारे व हमखास आर्थिक उत्पन्न मिळवून देणारे पीक आहे. परदेशात केळीला मोठी मागणी आहे. परंतू दर्जेदार उत्पादन करणे गरजेचे आहे. यासाठी या पिकातील तांत्रिक बारकावे समजून घेऊन आधुनिक तंत्राचा वापर करून लागवड पूर्व मशागतीपासून योग्य खत व पाणी व्यवस्थापन करून फ्रुटकेअर तंत्राचा वापर केल्यास पिकांमध्ये दर्जेदार व विक्रमी उत्पादन मिळू शकते.

यावेळी कोठडिया म्हणाले, की शेतीमध्ये काळानुसार बदलले पाहिजे. यासाठी वेळोवेळी तज्ञांचे मार्गदर्शनाची आवश्यकता असते. शेतकऱ्यांनी तज्ञांच्या सल्ल्यानूसार शेती पध्दतीमध्ये बदल केल्यास लाभ निश्चित होतो. यावेळी तालुका कृषी अधिकारी संजय वाकळे, कवी प्राचार्य सुरेश शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाचा राज्यस्तरीय कृषीभूषण व उद्यानपंडित पुरस्कार मिळाल्याबद्दल किरण डोके व दादासाहेब पाटील यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन गजेंद्र पोळ यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जैन इरिगेशन सोलापूर विभागाचे व्यवस्थापक संतोष डांगे यांनी केले. यावेळी केळी निर्यातदार अझहर पठाण, प्रगतशील शेतकरी अरूण पवार, प्रमोद भांगे, वैभव पोळ, बळीराम जाधव, संतोष पोळ, संतोष लुंकड, कैलास लबडे, प्रशांत नाईकनवरे, विष्णू पोळ, सोमनाथ हुलगे यांच्यासह तालुक्यातील विविध गावांमधील शेतकरी उपस्थित होते. उपस्थितांचे आभार जैन इरिगेशनचे किरण पाटील यांनी मानले.

## अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त
# खाटीक गल्ली येथे विविध कार्यक्रम

करमाळा(सं.प्र.) : येथील राजमाता अहिल्यादेवी होळकर हिंदू खाटीक तरूण मंडळाच्या वतीने ३१ मे ला पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवीहोळकर यांची २९७ जयंती विविध कार्यक्रम साजरी करण्यात येणार आहे. यामध्ये अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन तसेच सामाजिक, आरोग्यविषयक उपक्रम आदी कार्यक्रम खाटीक गल्ली, करमाळा येथे होणार आहेत. तरी या कार्यक्रमास शहरवासियांनी उपस्थित रहावे; असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष पै.गजेंद्रकुमार पलंगे यांनी केले आहे.

# इंजि.राजेंद्र डावरे यांचे निधन



करमाळा(सं.प्र.) : करमाळा नगरपरिषदेचे प्रतिष्ठीत सार्व. बांधकाम ठेकेदार इंजि.राजेंद्र डावरे (वय-४१) यांचे २५ मे ला हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांचे मागे आई, दोन भाऊ, तीन बहिणी असा परिवार आहे. त्यांच्या अंत्यविधी प्रसंगी सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व धार्मिक क्षेत्रातील नागरीक उपस्थित होते. डावरे यांचे अचानक झालेल्या निधनाबद्दल करमाळा शहरातून हळहळ व्यक्त होत आहे.

इथं सौंदर्य जन्म घेतं..
होलसेल साडी डेपो
मो.9172092187
प्रोप्रा : मुन्नाशेठ हासिजा
सुरतच्या होलसेल भावात साड्या मिळतील.
लखमीचंद क्लॉथ स्टोअर्स भवानीपेठ, करमाळा.
ॲड.आशुतोष ल.हासिजा (मुंबई हायकोर्ट) मो.7387832186
• जेन्टस्/लेडीज कामगार पाहिजेत



## कंदर येथे भव्य कुस्तीचे जंगी मैदान
# पै.प्रकाश बनकर दीड लाखाच्या बक्षीसाचा मानकरी



करमाळा(सं.प्र.) : कंदर येथे छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त व छत्रपती संभाजीराजे कुस्ती संकुल उद्घाटनानिमित्त कंदर येथे भव्य कुस्तीचे जंगी मैदान भरविण्यात आले होते. यामध्ये उपमहाराष्ट्र केसरी पै.प्रकाश बनकर व पै.भारत मदने यांच्यात झालेल्या पहिल्या क्रमांकाच्या कुस्तीत उपमहाराष्ट्र केसरी प्रकाश बनकर याने विजय मिळवून दीड लाख रूपयाचा मानकरी ठरला.

आमदार संजयमामा शिंदे यांचे हस्ते छत्रपती संभाजीराजे कुस्ती संकुलचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर कुस्तीचेही उद्घाटन करण्यात आले. दोन नंबरची कुस्ती कंदर येथील पै.सतपाल सोनटक्के यांनी जिंकली व ७५ हजार रूपयांचा मानकरी ठरला. तीन नंबरची कुस्ती पै.अमित जगदाळे यांनी जिंकली व ५५ हजार रूपयाचा मानकरी ठरला तर ५१ हजार रूपयाची कुस्ती भैरू माने यांनी जिंकली तसेच ४१ हजार रूपयाची कुस्ती पै.अभिजीत तळेकर यांनी जिंकली. कुस्ती पाहण्यासाठी कंदर व परिसरातील कुस्तीप्रेमींनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. कुस्त्यांचे समालोचन राजाभाऊ देवकाते,धनाजी माने यांनी केले. यावेळी पोलीस निरीक्षक सुर्यकांत कोकणे, पै.रावसाहेब मगर, महाराष्ट्र केसरी चंद्रहास निमगिरे, पंचायत समिती सदस्य दत्ता जाधव, सुनील सावंत, पै.उमेश इंगळे, आदिनाथ कारखान्याचे माजी उपाध्यक्ष नानासाहेब लोकरे, सरपंच भास्कर भांगे, उपसरपंच मौलासाहेब मुलाणी, आदिनाथचे माजी संचालक नवनाथ शिंदे, मराठा क्रांती ठोक मोर्चाचे राज्य समन्वयक महेश डोंगरे, कुलदिप पाटील, रयत क्रांती संघटनेचे जिल्हा सरचिटणीस राजकुमार सरडे, भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे तालुका अध्यक्ष वैजनाथ भगत, शिवसेनेचे प्रमोद वागज, ग्रा.पं.सदस्य अमर भांगे, दिलदार मुलाणी यांचेसह ग्रामस्थ व कुस्तीप्रेमी उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पै.सुहास मुळे, लखन शिंदे, वैभव इंगळे, विठ्ठल इंगळे, योगेश इंगळे, महेश इंगळे, अमोल डांगे, भाऊ माने, वैभव कोडलिंगे, संतोष इंगळे, हनुमंत शिंदे, आप्पासाहेब शिंदे, राहूल देवडकर, सतीश माने, शहाजी कुंडलकर, प्रविण शिंदे, आनंद शिंदे आर्दीनी परिश्रम घेतले. उपस्थितांचे स्वागत कार्यक्रमाचे संयोजक पै.उमेश इंगळे यांनी मानले.

आनंद ड्रायफ्रुटस्
उत्कृष्ट कंपनीचे व क्वॉलिटीचे ड्रायफ्रुट
प्रोप्रा : अमोल र. हिरण
मो.9270496867, 7057258385
• खास उन्हाळ्याकरीता...
थंडाई बोटल, ताक मसाला, कोकम सरबत, आवळा कँडी, वाळा सरबत, रसना, सब्जा बी, वाळा जुडी, रोझ सिरप, आईस्क्रिम पावडर, खडीसाखर, प्रदाळयुक्त गुलकंद, पापड आटा, पापड मसाला, पापड खार, मोहरी डाळ, मेथी,लोणचे मसाले...
एकवेळ अवश्य भेट द्या..!
एच.यु.गुगळे कापड दुकान समोर, मेनरोड, करमाळा.



डॉ.सौ.सुजाता मेहता व डॉ.राजेश मेहता यांचे चिरंजीव
चि.अपूर्व राजेश मेहता
एम.बी.बी.एस. फायनल परीक्षेत यश संपादन केल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन !
शुभेच्छुक
बाहूबली हरकचंद दोशी
महेश हरकचंद दोशी
दोशी परिवार,करमाळा





सेवानिवृत्त सहाय्यक फौजदार

## मा.श्री.कांतीलाल गोविंद जगताप

हे दि.१ जून २०२२ रोजी ८१ व्या वर्षात पर्दापण करत आहेत. त्यांना वाढदिवसानिमित्त आमच्याकडून हार्दिक.. हार्दिक..

## शुभेच्छा

**शुभेच्छुक**

पत्नी.. सौ.गोपिका कांतीलाल जगताप (सेवानिवृत्त शिक्षिका)

जावई.. श्री.संतोष रामचंद्र कांबळे (प्रोफेसर) श्री.सुभाष पांडूरंग भोसले(समाजकल्याण अधिक्षक)
श्री.संतोष केरबा गायकवाड(डॉक्टर) श्री.अतुल लाला खरात (जि.प.सदस्य) पीएच.डी

मुली.. सौ.वैशाली संतोष कांबळे (शिक्षिका) सौ.रूपाली सुभाष भोसले
सौ.दिपाली संतोष गायकवाड (डॉक्टर) सौ.पल्लवी अतुल खरात

नातू.. चि.हरशू,आदित्य, आरूष, दिदी, स्वीटी



स्व.जयकुमार रावजी व्होरा

## विनम्र अभिवादन

प्रत्येक समस्येवर उत्तर आहात तुम्ही...,
प्रत्येक ऋतुतील बहर आहात तुम्ही...,
आम्हा मुलांच्या जीवनाचं सारं सार आहात तुम्ही..!

प्रसिध्द आडत व्यापारी व आमचे मार्गदर्शक **स्व.जयकुमार रावजी व्होरा** यांच्या दि.२२ मे २०२२ रोजी असलेल्या ८२ व्या जयंतीनिमित्त विनम्र त्रिवार अभिवादन !

**अभिवादक** दिवाणजी, हमाल

## हार्दिक अभिनंदन



डॉ.सौ.सुजाता मेहता व डॉ.राजेश मेहता यांचे चिरंजीव

## चि.अपूर्व राजेश मेहता

याने एम.बी.बी.एस.फायनल परीक्षेत घवघवीत यश संपादन केल्याबद्दल हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा !

**शुभेच्छुक**

## कमलाई लॅबोरेटरीज्

(सर्व प्रकारच्या ॲलर्जी टेस्टींग सेंटर)

जीन मैदान, गाळा नं.१५, बसस्टॅन्ड जवळ, करमाळा.


# डॉ.जांभळे पॅथॉलॉजी लॅब, करमाळा.

पहिल्या मजल्यावर फ्लॅट क्र.७, विकी प्लाझा, बस स्टॅन्ड समोर, नौशाद कोल्ड्रींक वर, करमाळा

Mob: 9561771415, Land line : 02182-220122

**SUMMER OFFER May & June**

**डॉ.निलम जांभळे**

M.B.B.S. MD(Pathology) mumbai
Consulting Pathologist (Reg No.2011/04/1035)

### HEALTHCHECK 1

TOTAL TEST (48)



CBC (17)
IRON STUDY (4)
HbA1c (2)
LIPID PROFILE(8)
LIVER FUNCTION TEST (10)
KIDNEY FUNCTION TEST (4)
THYROID FUNCTION TEST (3)

MRP ~~2500/-~~
50% off
MRP 1250/-

| | | | |
|---|---|---|---|
| Double Marker | ~~1600/-~~ | 30% | 1120/- |
| Triple Marker | ~~1800/-~~ | 30% | 1260/- |
| Thyroid Function Test (T3, T4, TSH) | ~~400/-~~ | 30% | 280/- |
| TORCH (8) | ~~1600/-~~ | 30% | 1000/- |
| LH, PSH, Prol | ~~1100/-~~ | 30% | 770/- |
| AMH | ~~1600/-~~ | 30% | 1120/- |

### Anaemia Profile

TOTAL TEST (25)

CBC (17)
RETIC COUNT (1)
FERRITIN (1)
IRON STUDY (4)
Vit B12 (1)
FOLIC ACID (1)



MRP ~~2500/-~~
50% off
MRP 1250/-

### HEALTHCHECK 2

TOTAL TEST (50)



CBC (17)
IRON STUDY (4)
HbA1c (2)
LIPID PROFILE(8)
LIVER FUNCTION TEST (10)
KIDNEY FUNCTION TEST (4)
THYROID FUNCTION TEST (3)
Vit D3 (1) Vit B12 (1)


MRP ~~4000/-~~
50% off
MRP 2000/-

| | | | |
|---|---|---|---|
| Vit B12 | ~~600/-~~ | 30% | 420/- |
| Vit D3 | ~~1000/-~~ | 30% | 700/- |
| HbA1c | ~~450/-~~ | 30% | 250/- |
| Free Thyroid Function Test (FT3, FT4, TSH) | ~~500/-~~ | 30% | 350/- |
| LIPID PROFILE (8) | ~~400/-~~ | 50% | 200/- |

SUMMER OFFER कुपन सोबत असणे आवश्यक आहे

SUMMER OFFER चा लाभ नांवनोंदणी करून सुध्दा घेऊ शकता !


राष्ट्रवादी काँग्रेसच्या करमाळा तालुका अध्यक्ष पदी
मा.श्री.हनुमंत मांढरे-पाटील
यांची निवड झाल्याबद्दल..
हार्दिक अभिनंदन !
उपाध्यक्ष
अभिजीत महाडिक
अध्यक्ष
सागर(नाना) उरमुडे
शुभेच्छुक
छावा ग्रुप, करमाळा.


"तुम जियो हजारो साल..
साल के दिन हो पचास हजार ।"
1 June
आमचे मार्गदर्शक
डॉ.सुनील अडसुळ
आपणांस
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
कमलाई लॅबोरेटरीज्
(सर्व प्रकारच्या ॲलर्जी टेस्टींग सेंटर)
जीन मैदान, गाळा नं.१५, बसस्टॅन्ड जवळ, करमाळा., जि.सोलापूर


डॉ.सौ.सुजाता मेहता व
डॉ.राजेश मेहता यांचे चिरंजीव
चि.अपूर्व राजेश मेहता
याने एम.बी.बी.एस.फायनल परीक्षेत घवघवीत यश संपादन केल्याबद्दल..
हार्दिक अभिनंदन
शुभेच्छुक
● मनोज हि. गांधी ● संजय कां. कटारिया
● दिपक कां. कटारिया ● दिलीप शां. कटारिया ● परेशशेठ र. दोशी
● विजय र. दोशी ● गिरीष प्रे. दोशी ● इक्बाल म. खान
● नितीन पा. दोशी ● सुधीर पु. घोडके

# लाकडी-निंबोळी प्रकल्पाला स्थगिती द्यावी

## करमाळा शिवसेनेचे शिवसेना सचिव खा.देसाई यांना निवेदन

करमाळा(सं.प्र.) : लाकडी निंबोळी प्रकल्पाच्या माध्यमातून करमाळा तालुक्यातील शेतकऱ्यावर अन्याय करून उजनीतून बेकायदेशीररित्या पाच टीएमसी पाणी पुणे जिल्ह्याला पळविण्याचा घाट उपमुख्यमंत्री अजित पवार व पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांनी घातला आहे. या प्रकल्पाला तात्काळ स्थगिती द्यावी; अशी मागणी करमाळा शिवसेनेच्या वतीने करण्यात आली आहे.



शिवसेना सचिव तथा खासदार अनिल देसाई यांना शिवसेनेच्या शिष्टमंडळाने निवेदन दिले आहे. यावेळी उपजिल्हाप्रमुख महेश चिवटे, युवा सेना शहरप्रमुख विशाल गायकवाड, देवळालीचे राहूल कानगुडे, माजी नगरसेवक अनिल पाटील, अजिनाथ इरकर आदी पदाधिकारी उपस्थित होते. प्रसिध्दीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, की उजनी धरणावरून संपूर्ण सोलापूर जिल्हा व मराठवाड्याला पाणीपुरवठा केला जातो. सध्या उपलब्ध असलेल्या पाण्यात सोलापूर जिल्ह्याची तहान भागत नाही. उजनी धरणात प्रचंड गाळ साचल्यामुळे त्याची साठवण क्षमता कमी झाली आहे. करमाळा तालुक्यातील उजनी धरणावरील अनेक पाणीपुरवठा सिंचन योजना प्रलंबित आहेत. या उजनी धरणासाठी करमाळा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादीत करण्यात आल्या. करमाळ्यातील शेतकऱ्यांची घरेदारे, शेती धरणाच्या पाण्यात गेली. मात्र अद्यापही करमाळा तालुक्यातील ७५ टक्के क्षेत्राला पाणी मिळत नाही. सोलापूर जिल्ह्यातील अनेक गावे पाण्यासाठी तळमळत असताना उलट दिशेने धरणाच्या प्रस्तावात नसताना पुणे जिल्ह्यासाठी या धरणातील पाणी पळवणे म्हणजे धरणग्रस्तांच्या दु:खावर मीठ चोळ्याचा प्रकार आहे. राजकीय दबावापोटी हा निर्णय तात्काळ घेऊन या योजनेला निधीची तरतूद करण्यात आली आहे. दुसरीकडे मात्र करमाळा तालुक्यातील अनेक योजनांची कामे निधीअभावी रखडली आहेत. या सर्व बाबींचा विचार करून करमाळा तालुक्यातील सर्व पाणीपुरवठा योजनांची पूर्तता करून तालुक्याचे हक्काचे सर्व पाणी करमाळा तालुक्याला देऊन मग इतर नवीन योजनांना मान्यता द्यावी; अशीही मागणी शिवसेनेच्या वतीने करण्यात आली.

शिवश्री क्लिनिक
डे केअर सेंटर
डॉ.आशुतोष पोपट कापले
B.H.M.S.(M.U.H.S.) Nasik
जनरल फिजीशियन ॲन्ड होमिओपॅथिक कन्सल्टन्सी
मो.9860982072
उपलब्ध सुविधा...
● ॲडमिट करण्याची सुविधा.
● ई.सी.जी. सुविधा
● बालरूग्णांसाठी वाफेची सुविधा
२४ तास अत्यावश्यक सुविधा
● वेळ : सकाळी ११ ते रात्री १०
आमची वैशिष्ट्ये....
● सर्व आजारांवर ॲलोपॅथिक, होमिओपॅथिक उपचार.
● मुळव्याध, त्वचा विकार उपचार.
● मानसिक आजारांवर उपचार.
● नपुसंगतेवरील उपचार.
● आहारासंबधी योग्य मार्गदर्शन.
● मशीनव्दारे रक्तातील शुगर(BSL) व Blood Precesure तपासणी व उपचार.
● जुनाट मधुमेहातील जखम व संधिवात विकारांवर उपचार
टीप भारतीय सैन्य दलातील जवानांची तपासणी फी घेतली जाणार नाही.
अहमदनगर येथील प्रसिध्द किडनीविकार तज्ञ
डॉ.आनंद काशिद (मुत्रविकार तज्ञ, लैंगिक विकार तज्ञ व किडनी ट्रान्सप्लान्ट सर्जन)
प्रत्येक महिन्याच्या पहिल्या रविवारी, करमाळा येथे
ओपीडी वेळ सकाळी १० ते १.००
पत्ता : सचिन मेडिकल समोर, B.M. कॉम्प्लेक्स, दत्तपेठ, करमाळा.

# राजकारण बाजूला ठेवून आदिनाथ चालू करावा : डॉ.पुंडे

करमाळा(सं.प्र.) : आदिनाथ सहकारी सहकार कारखाना बंद असल्याने ऊस उत्पादकांचे खूप हाल होत आहे. कारखान्याबाबत राजकारण न करता कुणीही कारखाना घ्यावा व चालू करावा; असे आवाहन माजी संचालक डॉ.वसंतराव पुंडे यांनी केले.

कारखान्याची काय परिस्थिती आहे हे सर्वांना माहित आहे. सध्या शेतकऱ्यांचे आतोनात नुकसान झाले आहे. शेतकरी रडकुंडीला आला असून वैतागलेल्या स्थितीत आहे. त्यामुळे पुढील हंगामात तरी आदिनाथ कारखाना चालू होईल का नाही हेही सांगता येत नाही. आज आदिनाथ अडचणीत कसा आला, याचा शोध-बोध न घेता चालू कसा होईल; हे पाहणे आवश्यक आहे. सध्यातरी साखर वेळेवर न विकल्याने बँकेने ताबा घेतला. त्याचा लिलाव तो कायदेशीर योग्य नियमानूसार आहे का ? इ. सर्व गोष्टी सभासदांपर्यंत आल्या नाही. सध्या कोर्ट कचेरी करत जर ही मंडळी बसलीतर त्यातून काहीच गोष्टी वेळेवर होणार नाही. पुढील हंगाम चालू करण्यास अडचणी येतील. काळ कोणासाठी थांबत नाही व तो थांबणार नाही. त्यामुळे आदिनाथची खरी परिस्थिती जाणून घेणे गरजेचे आहे व त्यातून सकारात्मक व आशादायी मार्ग सर्वांनी मिळून काढणे नितांत गरजेचे आहे. लवकरच नवीन संचालक मंडळाच्या निवडणुका होणे आवश्यक आहे. तोपर्यंत आदिनाथवर प्रशासकाची नेमणूक करावी व आगामी ऊस गळीत हंगाम कसल्याही परिस्थितीत चालू करावा; अशीही मागणी डॉ.पुंडे यांनी केली आहे.



# रिल्स स्टार विक्रम आल्हाट यांना 'पॉवर हाऊस परफॉर्मर' पुरस्कार प्रदान



करमाळा(सं.प्र.) : इन्स्टाग्रामवर महाराष्ट्रात प्रसिध्द झालेले करमाळा येथील रिल्स स्टार, हरहून्नरी कलाकार विक्रम आल्हाट यांना पुणे येथे पार पडलेल्या 'महाराष्ट्राचा युवा स्टार' या कार्यक्रमामध्ये 'पॉवर हाऊस परफॉर्मर' हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सायली अ‍ॅन्ड कुशल पिक्चर्स या संस्थेने हा कार्यक्रम पुणे येथे आयोजित केला होता. शॉर्ट व्हीडीओ अ‍ॅप मधून प्रसिध्दीस आलेल्या कलाकारांना या कार्यक्रमाव्दारे प्रोत्साहन म्हणून पुरस्कार प्रदान करण्यात आले.

विक्रम आल्हाट यांनी सुरूवातीला २०२० मध्ये टिकटॉकवर विविध गाण्यांवरती आपल्या शैलीत डान्स करून रिल्स बनविले. अल्पावधीतच त्यांना मोठी प्रसिध्दी मिळशली. त्यांना टिकटॉकवर लाखो फॉलोअर्सवर होते. टिकटॉक बंद झाल्यावर विक्रम आल्हाट यांनी इन्स्टाग्राम व मोज या अ‍ॅफवर रिल्स बनवायला सुरूवात केली व इकडेही त्यांच्या व्हिडीओला जोरदार प्रतिसाद मिळाला. इन्स्टाग्रामवर त्यांना जवळपास चार लाख फॉलोअर्स आहेत. विक्रम यांना दोन गाण्याच्या अल्बम मध्ये देखील काम करण्याची संधी मिळाली आहे. विक्रम हे करमाळ्यातील करंजकर हॉस्पिटलमध्ये मदतनीस म्हणून नोकरीला आहेत. आपली नोकरी सांभाळून ते हा छंद जोपासत असल्याने त्यांचे करमाळा तालुक्यातून कौतूक होत आहे.

# अमृता आगरवाल हिचा कबड्डी स्पर्धेत व्दित्तीय क्रमांक



करमाळा(सं.प्र.) : ४८ वी कुमार/कुमारी राज्यस्तरीय अजिंक्य पद कबड्डी निवड चाचणी स्पर्धेत करमाळा येथील व्यापारी उमेश आगरवाल यांची कन्या अमृता आगरवाल यांची निवड झाली असून पुणे जिल्ह्यात व्दित्तीय क्रमांक पटकाविला आहे. कुमारी अमृता आगरवाल यांना कबड्डी खेळाची आवड असून दरवर्षी कबड्डी स्पर्धेत भाग घेऊन यश मिळवले आहे. मे २०२२ मध्ये झालेल्या कबड्डी स्पर्धेत कुमारी गटामध्ये पुणे जिल्ह्याच्या निवड चाचणीत करण्यात आली आहे. या स्पर्धेचे नेतृत्वही अमृता हिने केले होते. या स्पर्धेसाठी पियुष हनवते, विद्या पठारे यांचे तिला मार्गदर्शन लाभले. कबड्डी खेळात तिला विशेष आवड असून परिवारातून तिला यासाठी पूर्ण सहकार्य मिळते. या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतूक व अभिनंदन होत आहे.

## जाहीर निवेदन

**रोहिणी क्लिनिक, करमाळा** येथील दैनंदिन रूग्णसेवा (ओपीडी) याच इमारतीत पहिल्या मजल्यावर खालीलप्रमाणे नियमित चालू आहे.

**सोमवार ते शुक्रवार दररोज सकाळी ११ ते सायं.४**
(शनिवार, रविवार व दररोज संध्याकाळी बंद राहील)

कृपया सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती !

**सौ.रोहिणी नगरे** (संपर्कप्रमुख, रोहिणी क्लिनिक करमाळा.)
मो.7263968890/9082299087

टीप : रूग्णालयात कामासाठी **कर्मचारी, सफाईगार** व **निर्व्यसनी बदली वाहनचालक** हवे आहेत. इच्छुकांनी फोनवर किंवा हॉस्पिटलमध्ये प्रत्यक्ष सकाळी ११ ते ४ या वेळेत संपर्क साधावा !

# प्रतापसिंह मोहिते-पाटील महाविद्यालयाला इराणच्या शास्त्रज्ञांची भेट



करमाळा(सं.प्र.) : सुक्ष्मजीवशास्त्र विभाग तर्फे आयोजित सुक्ष्मजीवशास्त्र विषयातील थोर शास्त्रज्ञ डॉ.लिदरबर्ग यांच्या जयंतीनिमित्त सुक्ष्मजीवशास्त्रज्ञ सोसायटी ऑफ इंडिया च्या विद्यार्थी शाखेच्या व फरमेंटेड फूड फेस्टीव्हलच्या शुभारंभानिमित्त इराण येथील प्रसिध्द शास्त्रज्ञ डॉ.एल्हाम जफेर्जादेह यांनी करमाळा येथील प्रतापसिंह मोहिते-पाटील महाविद्यालयास सदीच्छा भेट दिली. यावेळी त्यांचे समवेत सुक्ष्मजीवशास्त्रज्ञ सोसायटी इंडियाचे अध्यक्ष प्रा.डॉ.ए.म.देशमुख, श्री शिवाजी महाविद्यालय बार्शीचे माजी प्राचार्य डॉ.प्रकाश थोरात, यशकल्याणी संस्थेचे अध्यक्ष गणेश करे-पाटील, मोहिते-पाटील महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य एम.एस.वाघमारे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी सुक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ.प्रविण देशमुख व इराणचे शास्त्रज्ञ डॉ.जफेर्जादेह यांनी दोन वर्षाच्या संशोधनातून बनवलेल्या अ‍ॅटीसेप्टीक चे अनावर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले व ते कसे बनवले गेले याचे व्याख्यानरूपी प्रसारण डॉ.जफेर्जादेह यांनी केले. यावेळी फरमेंटेह फूड फेस्टीव्हल चे आयोजन करण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदविला.

याप्रसंगी प्रमुख पाहूण्यांनी महाविद्यालयाच्या वेगवेगळ्या उपक्रमांची चलचित्र च्या माध्यमातून माहिती घेतली. सुत्रसंचालन कु.शिफा सय्यद व कु.सविता आंधळकर यांनी केले. प्रास्ताविक डॉ.प्रविण देशमुख यांनी केले.

## घरजागा विकणे आहे

करमाळा शहरातील दत्तपेठ येथील मेनरोड वरील ७०० स्के.फुट नवीन आरसीसी बांधकाम व सर्व सोयीनेयुक्त असलेली घरजागा विकणे आहे. तसेच नगररोडवरील १ गुंठा प्लॉट विकणे आहे.

● संपर्क : मो.नं.9423326590

## श्री गजानन आयुर्वेद

॥ श्रीराम समर्थ ॥
डॉ.श्री.दिपक सुर्यकांत पाटील
मल्टीस्पेशालिटी स्पाईन ऑर्थो केअर सेंटर
डॉ.सौ.वैष्णवी दिपक पाटील

* आयुर्वेदाचे वरदान-ऋतू बदलानुसार "पंचकर्म"व्दारे शरीरशुध्दी *

- वमन / विरेचन -

* खालील आजारावर उपयुक्त *
वाढलेले वजन, आम्लपित्त,पोटाच्या तक्रारी, कफाचा त्रास, जुनी सर्दी,पिंपल्स,स्किन इन्फेक्शन सोरीयासिस,Eczema,वाढलेली उष्णता स्त्रीयांमधील पाळीच्या तक्रारी P.C.O.D., स्त्री-पुरुष वंध्यत्व, थायरॉइडचा त्रास इ.

* उपलब्ध सुविधा *
* प्रकृतीपरिक्षण-नाडीपरिक्षण
* पंचकर्मव्दारे शरीरशुध्दी
* प्रतिकारशक्ती वाढविणारी 'रसायन चिकित्सा'
* ऋतुचर्या-दिनचर्या मार्गदर्शन
* अनुभवी प्रशिक्षित केरळीयन पंचकर्म स्टाफ

"श्रीस्मरण" बिल्डींग, शाहुनगर(सेकंड लेन), श्रीकमलाभवानी रोड, करमाळा-413203 जि.सोलापूर 9822997409/9970765945
www.spineorthoayurved.com shrideepak17@gmail.com shrigajananayurved Shri Gajanan Ayurved Multispeciality Spine Ortho Care

## स्वस्तिक

फ्लॅट डोअर्स, सॉमिल अ‍ॅन्ड हार्डवेअर

आमच्याकडे....
**खिडकी, फ्लॅट डोअर**
**लाकडी दरवाजे** योग्य दरात मिळेल



● संपर्क : सुतारगल्ली, करमाळा.

प्रोप्रा : ईश्वरसिंह परदेशी(9960490931, 8055519507)

# तालुक्यातील सर्व निवडणूका भाजपा ताकदीनिशी लढविणार

## भाजपा पदाधिकाऱ्यांचा पत्रकार परिषदेत निर्धार




करमाळा(सं.प्र.) : करमाळा तालुक्यातील सर्व निवडणुका भारतीय जनता पार्टी संपूर्ण ताकदनिशी लढविणार असल्याचे स्पष्ट मत भाजपाचे तालुका अध्यक्ष गणेश चिवटे व शहराध्यक्ष जगदीश आगरवाल यांनी व्यक्त केले.

२५ मे रोजी भाजपाच्या वतीने पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी चिवटे व आगरवाल यांनी हे विधान केले. याप्रसंगी भाजपाचे तालुका सरचिटणीस अमरजित साळुंखे, भाजपा युवा मोर्चाचे अध्यक्ष दिपक चव्हाण, रामा ढाणे, पै.अफसर जाधव, शाम सिंधी, भारत जाधव, अमोल पवार, सचिन गायकवाड आदी पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी दिपक चव्हाण म्हणाले, की नगरपालिका निवडणुकीत २००९ पासून भाजप सक्रिय आहे. २०११ मध्ये भाजपने स्वतंत्र पॅनल दिला होता. त्यानंतर २०१६ मध्ये भाजपने चांगले यश मिळवले होते. याही निवडणुकीत भाजपचे उमेदवार चांगल्या मतांनी निवडून येणार असून जनता यावेळी भाजपाला करमाळा शहराचा स्वच्छ कारभार करण्यास संधी देणार असल्याचे सांगितले.

### विकासाचे राजकारण करणार

आगामी निवडणुकीत यश-अपयशाचा विचार न करता नागरीकांचे प्रश्न घेऊन भाजप पूर्ण ताकदीनिशी उतरणार आहे. करमाळा शहरातील नागरीकांच्या आरोग्यविषयक तसेच रस्ते,पाणी, युवकांना रोजगारासाठी संधी अशा विविध प्रकारचा अजेंडा घेवून आम्ही विकासाचे राजकारणार करणार असल्याचे भाजपाचे तालुका अध्यक्ष गणेश चिवटे यांनी सांगितले.

### अन्यथा आम्ही २० जागा लढवू

येणारी निवडणुक ही करमाळा नगरपालिकेची असून यामध्ये भारतीय जनता पार्टी पूर्ण ताकदीने निवडणूक रिंगणात उतरणार असून यात पक्षश्रेष्ठींकडून आदेश आला तर युती करू अन्यथा स्वबळावर २० जागा लढविण्याची तयारी आम्ही केली आहे; असे स्पष्ट मत शहराध्यक्ष जगदीश आगरवाल यांनी व्यक्त केले.

या पत्रकार परिषदेत जगताप की बागल गटाबरोबर युती केली जाणार ? या प्रश्नावर उत्तर देताना भाजपा पदाधिकाऱ्यांनी म्हटले की, पक्षाकडून आदेश आला की त्या आदेशानूसार आमच्याबरोबर जे येतील त्यांना सोबत घेवून काम करू; असेही त्यांनी म्हटले. तसेच जगताप गटाचे युवा नेते शंभुराजे जगताप हे पत्रकार परिषदेला नाहीत. या प्रश्नाला उत्तर देताना म्हणाले, की आजची पत्रकार परिषद फक्त पदाधिकाऱ्यांची आहे. जगताप भाजपचे आहेत, त्यांनी भाजपात जाहीर प्रवेश केलेला आहे

शहरातील समस्येबाबत प्रश्न केला असता, त्यांनी म्हटले , की करमाळा शहरात नागरीकांना बऱ्याच सुविधांचा अभाव आहे. पालिकेत विविध योजनांमध्ये भ्रष्टाचार झालेला आहे. पालिकेवर भाजपाची सत्ता आल्यास नागरीकांच्या मुलभूत गरजा पुरविण्यासाठी प्रयत्न राहणार असून रस्ते, गटारी, पाण्याची समस्या, आरोग्य सुविधा इ. कामे करणार असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे नियोजन जयंत काळे-पाटील व महादेव गोसावी, भाजपा कार्यकर्त्यांनी केले.

# अल्पवयीन वधू-वराला बोहल्यावर चढण्यापूर्वीच पोलीसांनी रोखले - निंभोरे येथील घटना

करमाळा(सं.प्र.) : निंभोरे येथे पोलीसांनी बालविवाह रोखला असून या प्रकरणी वर-वधूच्या आई-वडीलांसह नवरदेवाविरूध्द गुन्हा दाखल झाला असून त्यांना पोलीसांनी ताब्यात घेतले होते. मात्र नंतर त्यांची जामिनावर मुक्तता करण्यात आली.

निंभोरे येथे बालविवाह होत असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. त्यानंतर अंगणवाडी सेविका, ग्रामसेवक, पोलीस पाटील यांच्यासह पोलीसांनी विवाहस्थळ गाठले. पवार व आवटे कुटूंबियात एका अल्पवयीन मुलीचा विवाह २१ मे रोजी दुपारी साडेबारा वाजता होता. लग्नाअगोदरच विशेष पथकातील मयूर कदम, गडदे, पाडुळे, भोसले यांनी कारवाई करत बालविवाह करणाऱ्यांना ताब्यात घेतले. वधूचे आई-वडील तसेच वर व त्याचे आई-वडील या संशयित आरोपींवर करमाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांना ताब्यात घेऊन अटक केल्यानंतर त्यांची जामिनावर सुटका करण्यात आली. पोलीस निरीक्षक सुर्यकांत कोकणे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

सोलापूर जिल्ह्यात सर्वात जास्त बालविवाह होत असल्याची माहिती सर्वेक्षणातून पुढे आली आहे. बालविवाह रोखण्यासाठी पोलीस अधिक्षक तेजस्वी सातपुते यांच्या मार्गदर्शनाखाली काम सुरू असून, तालुक्यातील झरे, कंदर, पोथरे येथील हिरडे वस्ती आदी गावे दत्तक घेण्यात आली आहेत.

## श्री साईनाथ मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त काञज येथे अखंड हरिनाम सप्ताह

करमाळा(सं.प्र.): काञज येथील श्री साईनाथ मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त तुकाराम महाराज गाथा पारायण सोहळा व अखंड हरिनाम सप्ताह आयोजित करण्यात आला. यामध्ये विविध मान्यवरांची किर्तनाचे कार्यक्रम संपन्न झाले. रणजितबापू महाराज यांचे काल्याचे किर्तनाने सप्ताहाची सांगता झाली. यावेळी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## एस.एस.के.एस. असोसिएटस्

### अकौंट मॅनेजर पाहिजेत

सीए फर्म मध्ये अकौटींगसाठी जागा भरणे आहे. (महिलांना प्रथम प्राधान्य)

**पदासाठी अटी खालीलप्रमाणे..**

- **कामाची वेळ :** सकाळी १० ते सायं ६.३० (महिलांसाठी वेळ त्यांच्या गरजेनूसार ॲडजेस्ट)
- **पात्रता :** कोणत्याही शाखेतील शिक्षण (मराठी, इंग्रजी नीट वाचता व लिहिता यावे) संगणक व्यवस्थित वापरता येणे आवश्यक.
- **पगार :** ६००० रू. किंवा त्यापेक्षा जास्त दिला जाईल.

संपर्क : सीए लहू काळे (मो.९७६२४४८२८२/९४२०४४८२८२/०२१८२-२२२१०३)

पत्ता : विद्यानगर, नवीन कोर्टासमोर, गाळा नं.१ व २, करमाळा.

टीप : येताना शैक्षणिक बायोडाटा घेवून येणे.

PMC registered | ICMR approved | Fully computerised


## श्री गणेश क्लिनिकल लॅब

क.न.प.शाळा नं.२ शेजारी, डॉ.परदेशी हॉस्पिटल मेनरोड, करमाळा, जि.सोलापूर

संपर्क
मो.9665824731
मो.9657319721

रक्त-लघवी संबंधित सर्व तपासण्या अत्याधुनिक मशीनव्दारे सवलतीच्या दरात केल्या जातील.

## आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर



रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.

- सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरूस्तीचे ठिकाण

कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.

मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)

दर महिन्याचा तिसरा रविवारी वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत

Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते

श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२

आमचे मित्र व धडाडीचे युवा नेते
## मा.श्री.हनुमंत मांढरे-पाटील
यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या करमाळा तालुका अध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल...

### हार्दिक अभिनंदन !



शुभेच्छुक
तबरेश सिकंदर सय्यद, नामदेव तुळशीराम कांबळे


तबरेश सय्यद


तुळशीराम कांबळे

# ॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥



कै.राजेंद्र डावरे (इंजि)

क्षणोक्षणी आमच्या मनी तुझी आहे आठवण
हीच आमच्या जीवनातील अनमोल आहे साठवण
पुर्नजन्म घ्यावा तु आमच्यासाठी हीच आमची श्रध्दांजली !

आमचे मित्र व प्रतिष्ठीत ठेकेदार
**इंजि.राजेंद्र डावरे** यांचे नुकतेच निधन झाले. त्यांचे आत्म्यास चिरशांती लाभो, हीच ईश्वर चरणी प्रार्थना !

**शोकाकुल**

**अमोल बबन ढवळे, प्रविण दत्तात्रय गायकवाड (इंजि), श्रीपाद काशिनाथ जोशी**

# सेवापूर्ती सन्मान सोहळा



करमाळा नगरपरिषदेचे लिपीक व अखिल भारतीय मजदूर संघ कर्मचारी संघटना क.न.प.चे अध्यक्ष
**श्री.प्रदीप नामदेव शिंदे**
नगरपरिषद क्षेत्रातून ३१/५/२०२२ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. त्यानिमित्त त्यांचा **सन्मान सोहळा**
व आमचा लाडका नातू
**चि.शंभुराजे प्रफुल्ल शिंदे**
याच्या वाढदिवसानिमित्त
**स्नेहभोजन कार्यक्रम**
बुधवार दि.१/६/२०२२ रोजी सायंकाळी ७.०० ते आपल्या आगमनापर्यंत आयोजित करण्यात आला आहे. तरी आपण सहकुटूंब उपस्थित रहावे; ही नम्र विनंती

**आपले नम्र** श्री.प्रदीप शिंदे व समस्त शिंदे परिवार, करमाळा.

**स्थळ : माजी आमदार जयवंतराव जगताप सभागृह महादेव मंदिरासमोर, किल्लावेस, करमाळा.**

**सौजन्य : फ्रेंडस्‌ मोबाईल शॉपी,**


# Admissions open



कै.गिरधरदासजी देवी



Chairperson
श्री.कन्हैय्यालालजी देवी



Director
सौ.सुनिता कन्हैय्यालाल देवी

श्री गिरधरदास देवी प्रतिष्ठान संचलित

## नवभारत इंग्लीश मेडिअम स्कुल ॲन्ड ट्विंकलींग स्टार्स पुणे रोड, करमाळा.

**वैशिष्ट्ये**



- एकमेव ISO नामांकन असणारी शाळा.
- एकमेव शाळेचे भव्य क्रिडांगण
- एकमेव डिजीटल वर्ग असणारी शाळा
- एकमेव रंगीत बेंच असणारी शाळा.
- एकमेव आर.ओ.वॉटर प्लँट असणारी शाळा.
- शाळेमध्ये विस्तृत वाचनालयाची सोय.
- शाळेच्या प्रत्येक मजल्यावर आकर्षक शैक्षणिक रंगरंगोटी
- प्रत्येक वर्गात व ग्राऊंडवर सुध्दा सीसीटीव्ही असणारी एकमेव शाळा.
- शाळेमध्ये सर्व प्रकारच्या लॅब उदा.. कॉम्प्युटर लॅब मॅथ्स् लॅब, सायन्स लॅब
- शाळेचे स्वत:चे ढोल-ताशा पथक, लेझीम, टिपऱ्या इ.
- शाळेमध्ये शिकवल्या जाणाऱ्या कराटेचे डेमो, गॅदरींगमध्ये प्रत्येक कार्यक्रमात, रोडवर होणाऱ्या प्रात्यक्षिकामध्ये मुलींचा सहभाग.
- एकमेव अशी शाळा की ज्यामध्ये गणित प्रदर्शन भरवण्यात येते.
- एकमेव अशी शाळा जी स्वत: सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन किमान १००० ते १५०० लोकांच्या उपस्थितीत.
- एकमेव अशी शाळा की पुस्तक प्रदर्शन, पालखी सेलिब्रेशनचे आयोजन करते.
- शिशुवर्गासाठी स्वतंत्र डायनिंग रूमची व्यवस्था
- एकमेव अशी शाळा की जिथे उच्च पदवीधर, अनुभवी व समर्पनाची भावना असणारी जवळजवळ २५ शिक्षक वृंद
- शाळेचा स्वतंत्र बगीचा व त्यामध्ये वेगवेगळ्या गेम्स्‌ उपलब्ध.
- एकमेव अशी शाळा ज्यामध्ये २०० च्या पुढे शैक्षणिक साधने विद्यार्थ्यांना प्रॅक्टीकल नॉलेज देण्यासाठी
- अद्ययावत टेक्नॉलॉजीचा वापर करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास. उदा.. टॅबचा वापर.
- पालकांना पाल्यांची दररोजची माहिती मोबाईल, फोनवर उपलब्ध.
- प्रत्येक वर्षी इ.१० वीचा १००% निकाल. २०२०-२१ मध्ये उच्चांक गाठणारा निकाल. प्रथमेश नागेश मोहिते यास ९९% गुण प्राप्त.
- नवभारत बाहेर पडणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांनी ज्ञानाचा भंडार घेऊन मोठ्या शाळांमध्ये, कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. विशेषत: **यश श्रीपाद शेटे(अडकर) प्रथमेश जितेंद्र क्षीरसागर** या विद्यार्थ्यांना फर्स्ट इंटरव्ह्यू मध्ये ॲडमिशन मिळाले. **प्रसाद शरद कोकीळ** हा विद्यार्थी ॲप इनव्हाईट करत असून त्यात पुणे जिल्हा हॉस्पीटलची माहिती मिळणार.

So Hurry up for Admissions..
**Admissions open**



शाळेच्या अभ्यासक्रमात
**वैदिक मॅथ्स्‌ फ्री**

**Contact** Mrs.Sunita Mohite (7741907285)
Mrs.Sharada Kokil (9960522370)

# करमाळेकरांचं प्रेम कधीच विसरू शकत नाही

## ३१ वर्षाच्या सेवेनंतर करमाळ्यातच स्थायिक

करमाळेकरांनी जे प्रेम दिले आहे, ते कधीच विसरता येणार नाही. करमाळ्यातून जे प्रेम मिळाले त्या जोरावरतीच करमाळा येथे आपण स्थायिक झालो आहोत व इथेच कार्यरत असून समाधानकारक वाटचाल सुरू आहे. असे करमाळा अर्बन बँकेचे सेवानिवृत्त ऑफिसर हुकूमचंद शिवलाल कोठडिया यांनी सांगितले.

आपल्या वाटचालीबाबत श्री.कोठडिया सांगत होते की, माझं बालपण मंद्रुप (ता.द.सोलापूर) येथे गेले. माझे शिक्षण बी.कॉम झाले आणि त्यानंतर व्यवसायाच्या निमित्ताने करमाळा अर्बन बँकेत क्लार्क म्हणून १५ सप्टेंबर १९७६ ला आलो. या बँकेत ३१ वर्षे सेवा करून २००७ ला सेवानिवृत्त झालो आहे. करमाळा शहरातील नागरीकांचे खूपच प्रेम लाभले. करमाळा नगरीचे माजी नगराध्यक्ष कै.गिरधरदास देवी तसेच करमाळा अर्बन बँकेचे विद्यमान चेअरमन कन्हैय्यालाल देवी यांच्या मार्गदर्शनाखाली बँकेत काम करताना कधीच अडचण आली नाही. आपण निश्चितच प्रकारे माझ्या वाट्याला आलेले काम समाधानकारक केले. करमाळा अर्बन बँकेचे सभासदही अतिशय समजुतदार असल्याने बँकेत कधीही वादावादीचे प्रसंग आले नाहीत. अतिशय समाधाने या बँकेतून सेवानिवृत्त झालो आहे. २४ फेब्रुवारी १९८१ ला जिवराज दोशी (लोणी, ता.इंडी, कर्नाटक) यांची कन्या सुवर्णा हिच्याबरोबर विवाह झाला. पत्नीने पूर्ण साथ दिल्यामुळे मला माझी सेवा समाधानकारक पार पाडता आली. सध्या करमाळा शहरात माझ्या मुलाचा सुमंगल किराणा स्टोअर्स हा व्यवसाय असून त्याच्या सोबत दिवसातील काही वेळ घालवत असतो. पहाटे साडेचारला उठतो. त्यानंतर व्यायाम, आंघोळ, देवपुजा, दुपारी दुकान आणि सायंकाळी वाचन असा माझा नित्यक्रम आहे.



**संपूर्ण नांव :** श्री.हुकूमचंद शिवलाल कोठडिया,
**जन्म तारीख :** १९/१०/१९४९
**शिक्षण :** बी.कॉम.
**लहानपण :** मंद्रुप, ता.दक्षिण सोलापूर
**बहिणी :** लिलावती अरूणकुमार शहा (पुणे),
सौ.रजनी जयकुमार गांधी (दुधणी)
**लग्न :** २४/१२/१९८१
**पत्नी :** सौ.सुवर्ण हुकूमचंद कोठडिया
**मुलगी :** सौ.प्रगती निशांत शहा (सोलापूर)
**मुलगा :** प्रितम हुकूमचंद कोठडिया (बी.कॉम, जी.डी.सी.ॲन्ड ए., एलएल. बी ॲपिअर)
**आनंदाचा क्षण :** करमाळा अर्बन बँकेतील पहिला ६५ रूपये पगार मिळाला तो.
**दु:खाचा क्षण :** शेवटचा पगार आणि रिटायर्डमेंट
**भविष्यातील स्वप्न :** उरलले आयुष्य सत्कारर्यात घालविणे .

**मो.९५७९३३०४३७**

# पतीच्या निधनानंतर दु:ख बाजूला सारून व्यवसायात पदार्पण

## वेल्डींग पासून ते फिटींग पर्यंत सर्व काम करते

वयाच्या ३४ व्या वर्षी आकस्मात पतीचं निधन झालं. पदरामध्ये दोन मुले व दोन मुली यांचा सांभाळ, शिक्षण कसं करायचं ? ना भांडवल, ना बँकेत बॅलन्स. अर्थातच पतीचा असलेला व्यवसाय करण्याशिवाय गत्यंतर नव्हतं. खरंतर या व्यवसायातलं काहीच माहित नव्हतं. पण हिंम्मत आणि जिद्द असल्यानंतर काहीही घडू शकतं.अशाचप्रकारे श्रीमती शिल्पा अनिल किरवे यांनी वेल्डींग, कलरींग, फिटींग आदी कामे स्वत: शिकून पतीचा व्यवसाय कार्यरत ठेवला आणि व्यवसायातही यश मिळवलं व मुलांचंही जीवन सुखकारक केलं.

शिल्पा किरवे या मुळच्या शिल्पा दत्तू पवार अशा होत्या. त्यांचे वडील अगोदर दूध डेअरीमध्ये तर नंतर मंत्रालयात पिओ म्हणून कार्यरत होते. आई विमल पवार या छत्रपती शिवाजी हॉस्पिटल कळवा येथे कार्यरत होत्या. त्यांना आणखीन चार बहिणी व एक भाऊ असा परिवार होता. आई-वडीलांनी त्यांचं बारावी पर्यंत शिक्षण केलं. आणि २३ मार्च २००३ ला अनिल पांडूरंग किरवे (करमाळा) यांच्या बरोबर विवाह लावून दिला. खरंतर मुंबईत बालपण गेलेली ही मुलगी करमाळ्यात रमेल की नाही, अशी स्थिती असतानाही त्यांनी आपला संसार वाढवला. अनिल किरवे यांनीही लग्नानंतर वेगवेगळ्या व्यवसायात पर्दापण केले आणि त्याला पाठबळ देण्याचे काम शिल्पाताई यांनी केले. पहाता पहाता व्यवसाय, घर आणि इतर साईटवरची कामे सुरू होती. घरात दोन पैसे येत होते आणि सर्वकाही समाधानात चालू होतं. अशातच अचानक शिल्पाताईचे पती अनिल यांचे ३ सप्टेंबर २०१७ ला निधन झाले. आणि शिल्पाताईच्या समोर संपूर्ण अंधार दिसत होता. हाताशी कुंजली, अंजली या दोन मुली



तर पृथ्वीराज आणि युवराज ही दोन मुलं. चोहोबाजूने अंध:कार असताना पुढं काय करावं हे समजत नव्हते. ना घरात पैसा, ना पैसे येण्याजोगी साधन. जो होता पैसा तो कारखान्यात आणि घरात गुंतविला. होता थोडाफार पैसा हा दावाखान्यात गेला. शेवटी लेकरांसाठी काम करण्याची गरज होती. दुखवटा बाजुला सारून त्या त्यांच्या पतीच्या कारखान्यात कामाला जाऊ लागल्या. खरंतर त्या कारखान्यातलं त्यांना काहीच माहित नव्हत. पण कामगारांच्या मदतीनं त्यांनी काम करायला सुरूवात केली.

वास्तविक पाहता त्यांना कामगारांकडून काम करून घेणं आवश्यक होतं. पण त्यांना कामगारांकडून चुकीचे अनुभव आले. म्हणून त्यांनी स्वत: वेल्डींग, कलरींग, फिटींग, औवजारे निर्मित लेथ मशिनची कामे, गिअर बॉक्सची कामे करणे अशी सर्व कामे त्यांनी शिकून घेलती. यातूनच दोन वेल्डींगचे दुकाने व एक कुशनचे दुकान सुरू केले आहे. शेतीसाठी लागणारे सर्व औवजारे त्या बनवतात. त्यांच्याकडे आठ कामगार आहेत. सकाळी सहा वाजता उठून सर्व घरातील काम करून दहा वाजता फॅक्टरीत जातात. संध्याकाळी काम संपल्याशिवाय घरी येत नाहीत. रात्रीचे कधी नऊ-दहा ही वाजतात. त्यांनी हिंमत ठेवून हे सर्व काम चालवले आहे अणि प्रतिकुल परिस्थितीतही महिला धीरान कसा मार्ग काढू शकते हे दाखवून दिले आहे.

पतीच्या निधनानंतर माझ्यावर आकाश कोसळले होते. परंतू माझ्या चार लेकरांकडे पाहून मी दु:ख बाजुला ठेवून रडण्याऐवजी लढू लागले. काम शिकून घेतले. त्यावेळी परक्यांनीही व जवळच्यांनीही साथ दिली नाही. पण हिंमतीने मी काम करत गेले. समाजातील पुरूषांची नजर विचित्र आहे . एखादी तरूण विधवा स्वत:चा व्यवसाय करत असेलतर तिचं कौतूक करण्याऐवजी लोक नावं ठेवतात, पण मी त्याकडे लक्ष दिले नाही. बँकेने सुध्दा मला कर्ज नाकारले. पण माझ्या छोट्या मुलांच्या भवितव्यासाठी मी प्रतिकुल परस्थितीतून मार्ग काढत आजही संघर्ष घरत आहे. व यात मला चांगले यश मिळाले आहे व माझी मुलंही खूप चांगल्या पध्दतीने मला साथ देत असून शिक्षणही चांगल्या पध्दतीने घेत आहेत.

**...श्रीमती शिल्पा अनिल किरवे (९९२१२५६६९४)**

***

# आपला प्रवास खुप छोटा आहे

एक स्त्री बसमध्ये चढली आणि एका माणसाच्या शेजारी बसली आणि त्याला तिच्या बॅगांनी मार लागला. तो माणूस गप्प बसल्यावर दुसऱ्या बाईने त्याला विचारले, तिने बॅग मारली त्यावर तक्रार का केली नाही ? त्या माणसाने हासून उत्तर दिले, एवढ्या शुल्लक गोष्टीबद्दल नाराज होण्याची गरज नाही. कारण आपला एकत्र प्रवास खूप छोटा आहे. कारण मी पुढील थांब्यावर उतरत आहे. या उत्तराने महिलेला खूप त्रास झाला. तिने त्या पुरूषाची माफी मागितली.


आपल्या पैकी प्रत्येकाने हे समजून घेतले पाहिजे की या जगात आपला वेळ इतका कमी आहे की निरूपयोगी युक्तीवाद, मत्सर, इतरांना क्षमा न करणे, असंतोष आणि वाईट वृत्तीने काळोख करणे हा वेळ आणि शक्तीचा हास्यास्पद अपव्यय आहे.

✻ तुमचे हृदय कोणीतरी तोडले आहे का ? शांत राहणे, ट्रीप खूप लहान आहे.
✻ तुमचा कोणी विश्वासघात, फसविले, अपमान केला - आराम करा, तणावग्रस्त होऊ नका.
✻ कोणी विनाकारण तुमचा अपमान केला का ? - दुर्लक्ष करा, शांत रहा.

आमच्या सहलीची लांबी कोणालाच माहित नाही. उद्या कोणी पाहिला नाही, तो कधी थांबेल हे कोणालाच माहित नाही. आपली एकत्र सहल खूप लहान आहे.

# गुरूजनांविषयी कृतज्ञता

नगरपालिका मुले नं.२ च्या माजी आदर्श शिक्षिका तारामती दिगंबर उबाळे यांची त्यांचे विद्यार्थी अभिजीत वाशिंबेकर व दिपक हाके यांनी सदीच्छा भेट घेतली. विद्यार्थ्यांनी बाईंशी मनसोक्त गप्पा मारल्या. त्यांची शिकवण्याची पध्दत, अक्षराबद्दलचे मार्गदर्शन व त्यांचे अष्टपैलू व्यक्तीमत्व याबद्दल त्यांचे भरभरून कौतूक केले. तारामती उबाळे या विद्यार्थ्यांनी केलेल्या कौतुकाने भारावून गेल्या. अभिजीत हा त्यांच्या वडिलांचा व्यवसाय चांगल्या पध्दतीने सांभाळतो तर दिपक हाके हा बेंगलोर `थे अभियंता म्हणून कार्यरत आहे. दोन्ही विद्यार्थ्यांनी श्रीफळ-



साडीचोळी देऊन सत्कार केला व बाईंबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. त्याबद्दल उबाळे परिवार त्यांचा सदैव ऋणी राहील.




# हसताय काय?






शिक्षक : १५ फळांची नावे सांगा ?
विद्यार्थी : पेरू
शिक्षक : शब्बास
विद्यार्थी : थांबा
शिक्षक : गुड
विद्यार्थी : सफरचंद
शिक्षक : व्हेरी गुड. आता अजुन बारा फळांची नावे सांग ?
विद्यार्थी : एक डझन केळी
शिक्षकाने दोन तोंडात मारून घेतल्या.

पुणेरी मुलगा : कशी आहेस ?
नागपूरी मुलगी : बरी आहे.
पुणेरी मुलगा : आई कशी आहेस ?
नागपूरी मुलगी : बरी आहे.
पुणेरी मुलगा : बाबा पण बरेच असतील !
नागपूरी मुलगी : नालायका बाबा एकच आहेत.
पुणेरी मुलगा : हो.. माफ कर ताई

बीपी वाढला आहे..
बायको : अहो.., काल डॉक्टर मला सांगत होते की.. माझा बीपी वाढलाय
पण बीपी म्हणजे काय हे मला सांगा ना ?
नवरा : अग काही नाही. बी.पी. म्हणजे बावळटपणा

राजेरावरंभा शेतकरी उत्पादक कंपनी लि; करमाळा येथे
CEO नेमणे आहे
...शैक्षणिक पात्रता....
● B.Sc agri / MBA marketing / MBA Finance यापैकी शैक्षणिक पात्रता आवश्यक
● यापूर्वी FPC मध्ये CEO म्हणून कामाचा अनुभव असल्यास/कृषी विभागातील सेवानिवृत्त कर्मचारी असल्यास प्राधान्य.
● स्वत:कडे दुचाकी गाडी व वाहन चालवण्याचा परवाना असावा.
तरी पात्र इच्छुक उमेदवारांनी दि.४/६/२०२२ रोजी पाणी फाऊंडेशन कार्यालय, करमाळा या ठिकाणी दुपारी २.०० वाजेपर्यंत सर्व ओरिजनल कागदपत्रासह मुलाखतीस उपस्थित रहावे.
संपर्क : मो.९८३४४५९०५३, ९९२२८१६६५५



गीर गाई चे
प्युअर दूध घरपोच मिळेल.
गीर गाई च्या दूधापासून तयार केलेले
शुध्द तुप मिळेल
(एक किलो, अर्धा किलो व पावकिलो मध्ये उपलब्ध)
मिळण्याचे ठिकाण : संदेश मिल्क ॲन्ड मिल्क प्रॉडक्ट
वेताळपेठ, करमाळा. (मो.९८२२०५८१०६)



दवे आयुर्वेद भवन पनवेल
आमची दर्जेदार उत्पादने
रक्तशर्करा नियंत्रण : स्वीटो नील पावडर व काढा
जास्वंद तेल : केसविकारांसाठी
चोपचिनी काढा : संधीवात व त्वचा विकारांसाठी
मसलजेसीक तेल : वाताचे दुखणे, कंबरदुखी यासाठी सुप्रसिध्द तेल
मिळण्याचे ठिकाण : अभंग आयुर्वेद शिवाजीनगर, करमाळा., जि.सोलापूर
● संपर्क : डॉ.अमित दवे (मो.९८३३०३७२०८) / बी.व्ही.कुलकर्णी (मो.९४०४०४३०९१)

कमलनयन बजाज हॉस्पिटल, औरंगाबाद येथील प्रशिक्षित
मुळव्याध तज्ञ
डॉ.महेश घुगे M.B.B.S.,D.N.B.,(Gen.Surgery), FMAS
इंपल्स प्लस हॉस्पिटल, अहमदनगर
Ex Consultant, कमलनयन बजाज हॉस्पिटल, औरंगाबाद
प्रत्येक महिन्याचा २ रा शुक्रवार (१०/६/२०२२) वेळ : सकाळी ११ वा.
स्थळ : घोलप हॉस्पिटल, घोलपनगर, करमाळा.